IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दिवाणी प्रक्रिया सहिंता अंतर्गत कौटुबिंक हिंसाचार नुकसान भरपाई प्रक्रिया.

**प्रदिप निवृत्तीराव अनसरवाडकर**
**ॲड. राहुल रॉय**
**सुभाष देसाई कॉलेज ऑफ लॉ**

**सारांशः**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम-2005 कौटुंबिक हिंसाचार म्हणजे कुटुंबातील दुस-या सदस्याकडून शारिरीक व मानसिक, लैगिंक ,आर्थिक, शाब्दिक स्वरुपाची हिंसा असते.घरगुती हिंसाचार हा एक व्यापक मुद्दा आहे. जो प्रत्येक पैलुतून व्यक्तीवर परिणाम करतो ज्यामुळे पिडीताना दीर्घकालीन शारिरीक आणि मानसिक जखमा होतात. कौटुंबिक हिंसाचार त्यांचे प्रकार व न्यायालयीन प्रक्रिया महत्वाची आहे.

**कि वर्डः-**

कौटुंबिक हिंसाचार , कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार, शारिरीक , मानसिक , आर्थिक , लैगिंक, संरक्षण अधिकारी, कौटुंबिक घटना अहवाल, नोटिस, मेडिएशन, समझोता, आदेश,जबाब, अपिलकर्ता/प्रतिवादी पुरावे, उलटतपासणी, निर्णय ,त्रूटी .

## 1. प्रस्तावनाः-

घरगुती हिंसाचार ही केवळ विकसनशील देशांची समस्या नाही तर विकसीत देशामध्येही ती खूप प्रचलित आहे.भारतीय सविधानांच्या कलम 14 मध्ये असे नमूद केले आहे की कोणत्याही व्यक्तीला कायद्या समोर समानता किंवा राज्याकडुन कायद्याचे समान संरक्षण मिळव्यापासून वंचित ठेवले जाणार नाही.

घरगुती हिंसाचारामुळे महिलांना अतिशय भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते . त्यापैकी एक म्हणजे घरगुती हिंसाचार हा निसंशयपणे मानवी हक्काशी संबधित मुद्दा आहे .मानवी हक्कांच्या विकासात तो एक गंभीर अडथळा आहे. 1994 चा व्हिएन्ना करार आणि 1995 चा बीजिंग घोषणापत्र आणि कृत्री मंच यांनी देखील घरगुती हिंसाचाराला मानवी हक्कांचा मुद्दा मान्यता दिली.

## 2. स्पष्टीकरण आणि कायद्यातील तरतुदीः-

### घरगुती हिंसाचार म्हणजे कायः-

घरगुती हिंसाचार म्हणजे कौटुंबिक नात्यामध्ये होणारा शारिरीक मानसिक , लैगिक भावनिक किंवा आर्थिक छळ होय. यामध्ये शारिरीक छळासोबतच धमक्या देणे,अपमानीत करणे ,आर्थिक नियंत्रण ठेवणे आणि लैगिंक अत्याचार करणे यासारख्या गौष्टीचा समावेश आहे.

### घरगुती हिंसाचाराचे प्रकारः-

1) **शारिरीक हिंसाः-** मारहाण करणे,ढकलणे ,लाथ मारणे,चापट मारणे किंवा कोणत्याही प्रकारच्या शस्त्राने धमकावणे .मारहानीमुळे शारिरीक अवयवावर परिणाम होतो.

2) **मानसिक हिंसाः-** मानसिक आत्याचार याला भावनिक आत्याचारही म्हणतात . एखाद्या व्यक्तीला हेतू पुरस्पर मानसिक आघात पोहचवन्यासाठी केलेले वर्तन होय. टिका करणे,अपमान करणे,टोचुन बोलणे, कमी लेखणे , भावनेचा अनादर करणे इत्यादी.

3) **लैंगिंक हिंसा :-** लैगिंक हिंसा म्हणजे समती शिवाय घडणारी कोणतीही हिंसा .लैगिंक हिंसा म्हणजे कोणत्याही आवांछित लैगिंक वर्तण होय.

4) **आर्थिक हिंसा :-** आर्थिक हिंसा म्हणजे आर्थिक स्त्रोतावर नियंत्रण ठेवणे जसे कि पैसे देणे किंवा नाकारणे ज्यामुळे पिडीत व्यंक्तीला आर्थिक दृटया अवलंबुन रहावे लागते.

### तक्रार दाखल करणारी यंत्रणा-

- **संरक्षण अधिकारी**
- **सेवा प्रदाता**
- **दंडाधिकारी**
- **पोलीस**

घरगुती हिंसाचाराचा सामना करणा-या पिडित महिलासाठी शासनाने संरक्षण अधिकारी ,सेवा प्रदाता, यांची नियुक्ती केली आहे संरक्षण अधिकारी हे जिल्हा व तालुका ठिकाणी कार्यरत असतात पिडीत महिला संरक्षण अधिकारी अथवा मा.न्यायालय कौटुबिंक घटना अहवाल देवू शकतात.

**कौटुबिंक घटना अहवाल-**

हा अहवाल म्हणजे घरगुती हिंसाचाराची (मानसिक, शारिरीक, लैंगिक किंवा आर्थिक ) नोंदणी करणारा एक कायदेशिर दस्तऐवज आहे. ज्यामधे घटनेचा तपशिल असतो आणि पिडीतांना मदत मिळवून देण्यासाठी हा एक महत्वाचा कायदेशिर साधन आहे. या अहवालाचा उददेश घरगुती हिंसाचाराच्या घटनांची नोंद करणे आणि पिडीतांना कायदेशिर संरक्षण व मदत मिळवून देणे हा आहे.

संरक्षण अधिकारी कायदेशिर मदत मिळविण्यासाठी हा अहवाल तयार करतो या अहवालावर आधारीत न्यायालयीन प्रक्रिया होऊ शकते सामान्यतः दंडाधिका-याना अर्ज मिळाल्यापासुन तीन दिवसाच्या आत पहिल्या सुनावणीची तारीख निश्चीत करण्याचे बंधण असते आणि पहिल्या सुनावणीच्या सात दिवंसाच्या आत प्रत्येक अर्ज निकाली काढण्याचा प्रयत्न करावा लागतो . कौटुंबिक हिंसाचार कायदयामधे निर्धारित वेळेत पुर्व आणि जलद उपाय करण्याचे ततुद आहे यामुळे पिडीतेचे हक्क व अधिकार अतिक्रमित केले जात नाहीत.

**यंत्रणेव्दारे मदतः-**

- समुपदेशन
- कायदेशिर सहाय्य
- तातपुरता निवारा
- वैद्यकिय सहाय्य
- पोलीस सहाय्य

**दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत कौटुबिंक हिंसाचार प्रक्रियाः-**

1) **नोटिसः-** घरगुती हिंसाचार अहवाल मा.न्यायालयात प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत प्रतिवादी यांना हजर राहण्यासाठी नोटिस बजावली जाते.
2) **समुपदेशनः-** पिडीत महिला व प्रतिवादी यांचे कायदेशिर समुपदेशन केले जाते. कौटंबिक समस्या व त्यांचे गांभीर्य यासाठी समुपदेशन केले जाते.
3) **समझोताः-** पिडीत महिला व प्रतिवादी यांना समुपदेशनाव्दारे समजावुन सांगितले असता त्यांच्या निर्णयाद्वारे दोघेही एकत्र राहण्यास तयार होऊ शकतात.
4) **आदेशः-** पिडीत महिला प्रतिवादी सोबत राहण्यास तयार आहे परंतु प्रतिवादी तयार नसेल अशा परिस्थीत मा.न्यायालय तात्पुरता आदेश किंवा कायमस्वरुपी आदेश पारीत केले जातात.
   1-संरक्षण
   2-रहिवास
   3-आर्थिक अनुतोष
   4-मुलांचा ताबा
   5-देखभाल खर्च
   6-एकतर्फी
5) **जबाबः-** न्याय दंडाधिकारी हे पिडीत महिला व प्रतिवादी दोघाकडुन कायदेशिर जबाब नोंद करु शकतात.
6) **अपिलकर्ता व प्रतिवादी पुरावेः-** पिडीत महिला व प्रतिवादी या दोघांचेही पुरावे तपासले जातात म्हणजेच पुराव्याचे परिक्षण केले जाते.

7) **उलटतपासणीः-** पिडीत महिला किंवा प्रतिवादी या दोघांचीही उलटतपासणी केली जाऊ शकते
8) **निर्णयः-** पिडीत महिला व प्रतिवादी यांचे म्हणने ,जबाब ,पुरावे याव्दारे दंडाधिकारी न्याय देतात.हि शेवटची पायरी असते.

**कायद्यातील बारकावे/त्रुटीः-**

1) **संरक्षण अधिकारी यांची कमतरता-**

प्रत्येक जिल्हा व तालुका स्तरावर कमी-अधिक प्रमाणामधे संरक्षण अधिकारी यांचे कमतरता असु शकते किंवा एकाच संरक्षण अधिका-यावर अतिरीक्त कामाचा भार दिला जातो त्यामुळे पिडीत महिलेला मदत मिळयासाठी विलंब होऊ शकतो.

2) **त्रासदायक प्रकियाः-**

कौटुबिंक हिंसाचार कायद्यामधे जरी अर्ज निकाली काढण्याची वेळमर्यादा 7 दिवस असले तरी प्रत्यक्षात मात्र विलंब होतो .

3) **न्यायालयाचे वारंवार फेरे-**

पिडीत मिहिला त्रासदायक परिस्थीतीतुन न्यायासाठी तत्पर असते.परंतु न्यायायाचे वारंवार फेरे मारुन तीला आनखी मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते.

4) **आदेश मिळून अमलबजावनीस उशीर-**

न्यायालयाने दिलेले आदेश यांची प्रशासकिय स्तरावरुन अमलबजावणीस उशीर होतो.

5) **प्रतिवादी हजर न राहणे-**

प्रविवादीनां नोटीस काढुनही मा.न्यायालयामधे प्रतिवादी हजर होत नाही यास्तव विलंब होणे.

6) **न्यायदानास विलंब-**

कौटुबिंक हिंसाचार कायद्याचे उद्देश जरी जलद असला तरी प्रत्यक्षात मात्र विलंब होतो.

## 3. निष्कर्षः-

कौटुबिंक हिंसाचार कायदा हो पिडीतेसाठी न्याय आणि सुरक्षितता सुनिश्चित करतो त्यासोबतच सामाजिक जागरुकता वाढविणे.कौटुबिंक हिसांचार रोकण्यासाठी कायदे मजबुत करुन गैरवर्तन करणा-याला शिक्षा लागु करणे ,कायदेशिर मदत, समुपदेशन आणि सुरक्षित निवास यासारख्या सेवा प्रधान करुन आपण घरगुती हिंसाचार व निर्मुलनाच्या दिशेने महत्वपुर्ण प्रगती करु शकतो.

**संदर्भः-**


- कौटुंबिक हिंसाचार कायदा अधि-2005
- लिगल कानुन वेब पेज
- तेजश्री शिंदे – ( महिला तक्रार निवांरण केंद्र प्रभारी भरोसा सेल सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय भाईदर (प.) मि.भा.व.वि. पो. आयुक्तालय )
- संरक्षण अधिकारी- महिला व बालविकास विभाग ठाणे